# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार तसेच पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील:-**

**(१) संवर्ग:-** राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील, गट-अ ची पदे.

**(२) नियुक्तीचे ठिकाण:-** न्यायिक सेवेमध्ये महाराष्ट्रात कोठेही नियुक्ती होईल.

**(३) वेतनबँड:-** (१) रुपये २७,७०० - ४४,७७० अधिक नियमानुसार देय भत्ते.

(२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**(४) उच्च पदावर बढतीची संधी:-** ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र न्यायिक सेवेतील वरिष्ठ पदांवर.

**१.३** जाहिरात/अधिसूचनेमध्ये भरावयाच्या पदांचा तपशील देण्यात येईल. पदसंख्या शासनाने कळविल्यानुसार राहील व विज्ञापनेत प्रसिद्ध केली जाईल.

**१.४** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ अथवा त्यानंतर वेळोवेळी शासनाकडून करण्यात आलेल्या सुधारणा नुसार राबविण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे:- प्रस्तुत परीक्षा एकूण** तीन टप्प्यांमध्ये घेण्यात येते:-

| **(एक)** पूर्व परीक्षा | मुख्य परीक्षा | |
|---|---|---|
| | **(दोन)** लेखी परीक्षा | **(तीन)** मुलाखत |
| १०० गुण | २०० गुण | ५० गुण |

**३. पात्रता :-**

**३.१** भारतीय नागरिकत्व

**३.२ वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता :-**

**३.२.१ उमेदवारांनी त्यांच्या पात्र प्रवर्गानुसार खालीलप्रमाणे संबंधित अर्हता धारण करणे आवश्यक राहील:-**

| **अ. क्र.** | **पात्र प्रवर्ग** | **जाहिरातीमध्ये विहित दिनांकास वय** | | | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **किमान** | **कमाल** | | | |
| | | **अमागास / मागासवर्गीय** | **अमागास** | **मागासवर्गीय** | | |
| **१** | **नवीन विधि पदवीधर** | **२१** | **२५** | **३०** | (१) विधी शाखेतील पदवी. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करून पदवी प्राप्त केली असली पाहिजे आणि<br>(२) विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (L.L.M.) किमान ५५% इतक्या गुणांनी जाहिरातीमध्ये विहित केलेल्या दिनांकापर्यंत उत्तीर्ण असणे आवश्यक | --- |
| **२** | **वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता** | **२१** | **३५** | **४०** | विधि शाखेतील पदवी | **(१)** उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून **३ वर्षांचा** वकिली व्यवसाय.<br>**(२)** पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | **सेवा कर्मचारी(Ministerial Staff)**<br>(१) उच्च न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य,<br>(२) उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य,<br>(३) मंत्रालयाच्या विधि व न्याय विभागाच्या विधि उप-विभागामध्ये विधि सहायक आणि त्यापेक्षा उच्च पदावर काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाचे सदस्य,<br>(४) उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य | २१ | ४५ | ५० | विधि शाखेतील पदवी | विधि पदवी प्राप्तीनंतर किमान तीन वर्षांची सेवा झालेली असणे आवश्यक आहे. |

**३.२.२ वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव यांची गणना जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद दिनांकास करण्यात येईल.**

**३.२.३** जाहिरातीस अनुसरून निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता तसेच अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

**३.२.४** सांविधिक विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे, असे समजण्यात येईल.

**३.३ मराठी भाषेचे ज्ञान:-**

**३.३.१** उमेदवारांनी वरील अर्हतेसह खाली नमूद अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:-

**(१)** मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे.

**(२)** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे.

**(३)** मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे.

**३.३.२** मराठी भाषेच्या ज्ञानाबद्दलचे प्रमाणपत्र खालील प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करणे आवश्यक आहे:-

**(१)** वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता- संबंधित जिल्ह्याचे **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश.**

**(२)** नवीन विधि पदवीधर- विधि अभ्यासक्रमासाठी **(L.L.B/L.L.M.)** नाव नोंदणी केली असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा विद्यापीठ विभागाचे प्राचार्य/प्रमुख.

**(३)** उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी- ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे, असा विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.

(४) विशेष परिस्थितीत निवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्या पुर्नसेवाप्रवेशाद्वारे.

**३.३.३** मराठी भाषेविषयीची अर्हता धारण न करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन नियमानुसार सहा महिन्यांच्या आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**३.४ अनुभवाचा पुरावा :-**

अनुभवाबाबत खालील सक्षम प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१) वकीलांबाबत - जेथे उमेदवार प्रॅक्टिस करीत असेल त्या जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश.

(२) सेवा कर्मचाऱ्यांबाबत - ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.

**३.५** अंध उमेदवार सदर पदासाठी अर्ज भरण्यास पात्र नाहीत.

**३.६** मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांकरीता अनुज्ञेय असलेले कोणतेही फायदे/सवलती देय नाहीत.

**३.७** लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल किंवा गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या /काढून टाकलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या किंवा कोणत्याही पदाचा प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram

न करणारा अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी अपात्र ठरविलेला उमेदवार प्रस्तुत स्पर्धा परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरविला जाणार नाही.

**४. शुल्क (फी):-**

**४.१** प्रस्तुत परीक्षेकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय |
| (१) | पूर्व परीक्षा | ₹ ३९४/- | ₹ २९४/- |
| (२) | मुख्य परीक्षा | ₹ ५४४/- | ₹ ३४४/- |

**४.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) तसेच इतर मागास वर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५. पूर्व परीक्षा: -**

**५.१ परीक्षा योजना:-**

**५.१.१ प्रश्नपत्रिका:- एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| विषय व संकेतांक | दर्जा | माध्यम | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| विहित कायदेविषयक ज्ञान (**संकेतांक** ५०२) | पदाला साजेसा | इंग्रजी | १०० | १०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**५.१.२ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम:-**

(1) The Code of Criminal Procedure
(2) The Civil Procedure Code
(3)The Indian Evidence Act
(4)The Transfer of Property Act
(5)The Specific Relief Act
(6) The Maharashtra Rent Control Act
(7) The Limitation Act
(8) Constitution of India
(9) The Indian Penal Code
(10) The Law of Contract, The Sale of Goods Act and The Partnership Act.

**५.२. परीक्षा केंद्र:-**

**५.२.१** दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पूर्व व मुख्य परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येते:-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |

**५.२.२** वरीलपैकी कोणतेही एक जिल्हा केंद्र ऑनलाईन पद्धतीने मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.२.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.२.४** उमेदवाराने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.२.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**५.२.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेद्रांमध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.२.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या स्थायी/कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्या आधारे संबंधित महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा संबंधित महसुली मुख्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram

जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**५.२.८** आयोगाने उमेदवारास ज्या जिल्हाकेंद्रावरील परीक्षा उपकेंद्रावर प्रवेश दिला असेल त्याच ठिकाणी उमेदवारास उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

**५.३ पूर्व परीक्षेचा निकाल:-**

**५.३.१ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**(एक)** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

(**दोन**) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**(तीन)** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**(चार)** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**५.३.२** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उददेशाने घेण्यात येईल. गुणवत्तेनुसार एकूण पदसंख्येच्या साधारणपणे दहा पट उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील.

**५.३.३** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पर्याप्त उमेदवारांची संख्या ठरविण्याकरीता आयोगाकडून पूर्व परीक्षेसाठी निश्चित करण्यात आलेल्या किमान सीमारेषा (cut off line) किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटीची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येईल.

**५.३.४** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**५.३.५**पूर्व परीक्षेच्या अर्हतामानाच्या आधारे (cut off line) मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.६**पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने, पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

**५.३.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशद्वारे (एस.एम.एस.) द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.३.८** लघुसंदेशाद्वारे माहिती कळविण्याची सुविधा ही नेहमीच्या पध्दतीशिवाय अतिरिक्त सुविधा आहे. त्यामुळे पूर्व परीक्षेचा निकाल अथवा मुख्य परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत उमेदवाराने विहित कालावधीत स्वत: खातरजमा करणे आवश्यक आहे.

**६. मुख्य परीक्षा:-**

**६.१ परीक्षेचे टप्पे:-** दोन. लेखी परीक्षा व मुलाखत

**६.२ मुख्य परीक्षेस प्रवेश:-**

**६.२.१** पूर्व परीक्षेच्या सीमा रेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारास मुख्य परीक्षेकरिता प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना उमेदवाराला परीक्षेचे माध्यम निवडावे लागेल. तसेच एकदा निवडलेले माध्यम कोणत्याही परिस्थितीत बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**६.३ परीक्षा योजना:-**

**६.३.१ एकूण गुण:- (१) लेखी परीक्षा:-** २०० गुण **(२) मुलाखत:-** ५० गुण


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram

**६.३.२ प्रश्नपत्रिकांची संख्या:-** दोन अनिवार्य. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-

| पेपर क्रमांक | विषय | विषय संकेतांक | कालावधी | गुण | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | माध्यम | दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | (1) The Civil Procedure Code.<br>(2) The Transfer of Property Act.<br>(3) The Specific Relief Act.<br>(4) The Law of Contracts, The Sale of Goods Act and The Partnership Act. | ०७१ | तीन तास | १०० | पारंपरिक/ वर्णनात्मक | मराठी व इंग्रजी | पदाला साजेसा |
| २ | (1) The Indian Penal Code.<br>(2) The Evidence Act.<br>(3)The Code of Criminal Procedure.<br>(4)The Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act 1989 and The Protection of Civil Rights Act 1955.<br>(5) Essay on Current Legal topics (Approximately 800 words ) | ०७२ | तीन तास | १०० | पारंपरिक/ वर्णनात्मक | मराठी व इंग्रजी | पदाला साजेसा |

**६.३.३** आयोगाकडून परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्याकरीता पुरविण्यात येणाऱ्या पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

**६.३.४** मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत पुरवणी/अतिरिक्त उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

**६.३.५** पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ,ब,क,ड किंवा १,२,३,४) सलगरित्या सोडवावे.

**६.३.६** प्रश्नाचा एक भाग एका पानावर, तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल.

**७. मुख्य/लेखी परीक्षेचा निकाल:-**

**७.१** यशस्वी उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच १:३ हे गुणोत्तर प्रमाण ठेवण्यासाठी आयोगाने निश्चित केलेले एकसमान अंतिम गुण ज्यांनी मिळविले असतील असे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**७.२** मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान **५०** टक्के गुण मिळविणे ही किमान अर्हता राहील.

**७.३** महाराष्ट्र शासनाने सेवाप्रवेशाच्या प्रयोजनाकरीता मागास म्हणून मान्यता दिलेल्या ~~समाजातील~~ समाजाच्या उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान **४५** टक्के गुण मिळविणे ही मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र होण्यासाठी किमान अर्हता राहील.

**८. मुलाखत :-**

**८.१** मुलाखत ५० गुणांची असेल.

**८.२** मुलाखतीमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच अंतिम निवड/शिफारशीकरीता विचार केला जाईल.

**८.३** उमेदवाराची मानसिक दक्षता, कायद्याचे ज्ञान, स्पष्ट व तर्कशुध्द निर्णयक्षमता, न्यायनिर्णयांचा समतोलपणा, कौशल्य, दृष्टीकोन, नीतीतत्वे, आकलन शक्ती, संवाद क्षमता, चारित्र्य, बौद्धिक सखोलता आणि उमेदवाराची आवड यांचे मुल्यमापन करुन या संवर्गासाठी योग्यता निश्चित करणे हा मुलाखतीचा हेतू आहे.

**९. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**९.१** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**९.२** पात्रता/सवलतींसंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे (Claimed) आवश्यक आहे. अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/सवलत देय होणार नाही अथवा उमेदवारी अंतिम समजण्यात येणार नाही.

**९.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram

**९.४** लेखी मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**९.५** पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदर्भातील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**१०. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**१०.**१ अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१०.**२ सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे " भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) " हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१०.**३ " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " पर्याय सादर करण्यासाठी उमेदवारांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**१०.**४ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**१०.**५ पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**११. अंतिम निकाल:-**

**११.१** कामगिरीचे मूल्यमापन करण्याची पद्धत ही लेखी मुख्य परीक्षा व मुलाखत यामध्ये मिळालेल्या संख्यात्मक गुणानुसार विनिर्दिष्ट करण्यात येईल.

**११.२** लेखी मुख्य परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल.

**११.३** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

**१२. शिफारस:-**

**१२.१** **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**१२.२** मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना मुलाखतीनंतर त्यांची नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, ते प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**१२.३** शिफारसपात्र प्रत्येक उमेदवारास आयोगाकडील नोंदणीकृत क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील

**१३. प्रतीक्षा यादी :-**

अंतिम निकाल/शिफारस यादी जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष किंवा पुढील परीक्षेच्या अंतिम निकालाच्या दिनांकापर्यंत यापैकी अगोदर जे घडेल तो पर्यंत प्रतीक्षा यादी कार्यान्वित राहील.

**१४. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही:-**

**१४.१** न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल **किंवा**

**१४.२** नैतिक अधोगतीचा समावेश असणाऱ्या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल **किंवा**

**१४.३** उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल **किंवा**

**१४.४** उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल **किंवा**

**१४.५** दोनपेक्षा अधिक मुले असतील.

**१५. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

**१५.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-

**१५.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram

**१५.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**१५.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**१५.२** नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे **₹** २,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

**१५.३** नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला त्या कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना त्याची/तिची सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

**१५.४.** प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

**१६. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

**१६.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) गुणांची किमान सीमांकन रेषा.

**१६.२** पारंपरिक/वर्णनात्मक पध्दतीच्या पेपरची उत्तरपुस्तिका उमेदवारांना प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तथापि, माहितीचा अधिकार अधिनियमानुसार संबंधित उमेदवाराने अर्ज केल्यास केवळ संबंधित उमेदवाराचीच उत्तरपुस्तिका उपलब्ध करुन देण्यात येईल.

**१७.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक: २३ डिसेंबर, २०२१

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.


www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA, Telegram